# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर





ई मासिक विद्यासंवाद

मे २०२४| आवृत्ती-११


# 'रिचिंग टू अनरीच्ड' अभियान



विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

मे २०२४ | आवृत्ती-११

मार्गदर्शक
**डॉ. सुभाष चौधरी**
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

# वर्धेच्या रोजगार निर्मितीला 'रिचिंग टू अनरीच्ड'ची साथ
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त अभियान
## माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांची वर्धा जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्ताने राबविल्या जात असलेल्या 'रिचिंग टू अनरीच्ड' अभियानाची साथ वर्धा जिल्ह्यातील नैसर्गिक संसाधनांवर आधारित असलेल्या उत्पादन व प्रक्रिया उद्योगाला मिळणार आहे. मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प म्हणजे स्ट्रॉबेरी उत्पादन व प्रक्रिया उद्योगासह स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करून शाश्वत विकासाचा मार्ग शोधण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी आणि वर्धेचे जिल्हाधिकारी श्री राहुल कर्डिले यांच्या सोबत सोमवार दिनांक २० मे २०२४ रोजी सकारात्मक चर्चा झाली.

भंडारा, गोंदिया नंतर आता वर्धा जिल्ह्यात स्थानिक कृषी,जल, जंगल, स्थानिक कौशल्याधारीत उत्पादनापासून प्रक्रिया उद्योग निर्मितीला बळ देत नाविन्यपूर्ण पद्धतीने सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने पाऊल उचलले आहे. वर्धा जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संसाधनांचा वापर करून रोजगार निर्मिती व्हावी या दृष्टीने विद्यापीठाकडून कौशल्य विकासावर भर दिला जात आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने कौशल्य प्राप्त मनुष्यबळ तयार व्हावे म्हणून आगामी शैक्षणिक सत्रापासून कौशल्य विकास अभ्यासक्रम तयार केले आहे. संबंधित क्षेत्रात रोजगाराच्या दृष्टीने आवश्यक असलेले कौशल्य अभ्यासक्रम विद्यापीठाकडून शिकविले जाणार आहे. कौशल्य प्राप्त करीत रोजगार तसेच स्वयंरोजगार उभारण्याबाबत इच्छुक तरुणांना आवश्यक ती मदत विद्यापीठाकडून केली जात आहे. कौशल्य प्रशिक्षणानंतर रोजगार/उद्योग स्थापण्याकरिता आवश्यक सहायता आणि सुविधा या अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणार आहे. वर्धा जिल्ह्यातील स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करून विविध प्रकल्प 'रिचिंग टू अनरीच्ड' अभियान राबविणबाबत ही बैठक घेण्यात आली.

वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीला माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, वर्धा जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले, विद्यापीठाचे आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता व प्रकल्प अधिकारी डॉ. प्रशांत कडू, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता व जिल्हा समन्वयक डॉ. संजय कवीश्वर, जिल्हा नियोजन अधिकारी श्री. अनिरुद्ध राजूरवार, विद्यापीठाच्या रेशीम उद्योग व्यवस्थापन व संशोधन केंद्राचे आंतरराष्ट्रीय तांत्रिक सल्लागार डॉ. सुरेश रैना, संचालक डॉ. सुरेश मसराम, बापूराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. गिरीश ठाकरे, यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र बेले, जिल्हा कौशल्य विभागाचे श्री. राठोड यांच्यासह अन्य उपस्थित होते.

## स्ट्रॉबेरी प्रकल्पासह वॉटर कप गटांची मदत

वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये बदल व्हावा म्हणून विद्यापीठाकडून जिल्हा प्रशासनाच्या मदतीने राबविल्या जाणाऱ्या 'रिचींग टू अनरीच्ड'' या अभियानाबाबत चर्चा करण्यात आली. यामध्ये जिल्ह्यात मा. जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेने आणि प्रयत्नाने नव्यानेच घेतल्या जात असलेल्या स्ट्रॉबेरीचे नविन्यपूर्ण वितरण आणि प्रक्रिया उद्योग कसा निर्माण करता येईल यावर चर्चा करण्यात आली. सोबतच पाणी फाउंडेशनच्या 'फार्मर्स कप' स्पर्धेसाठी तयार असलेल्या जिल्ह्यातील अंदाजे २ हजार गटांसोबत मिळून अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे आर्वी उपसा सिंचन प्रकल्प निर्मितीत स्थानिक विद्यार्थ्यांचा कौशल्य वाढीच्या दृष्टीने सहभाग कसा करून घेता येईल, याबाबत चर्चा करण्यात आली. या सोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करीत नवीन प्रकल्प कसे उभे करता येईल या विषयावर चर्चा करण्यात आली



## 'ग्रीन चॅनल' अंतर्गत गोंदिया जिल्ह्यात राबविणार कौशल्य विकास अभ्यासक्रम
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा उपक्रम
## शताब्दी महोत्सव अंतर्गत 'रिचिंग टू अनरीच्ड' अभियान

महाराष्ट्र सरकारच्या महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळाच्या 'ग्रीन चॅनल' या कार्यक्रम अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने गोंदिया जिल्ह्यात कौशल्य विकास अभ्यासक्रम राबविले जाणार आहेत. सदर उपक्रम विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या 'रीचिंग टू अनरीच्ड' या अभियानाचा भाग म्हणून आगामी शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी आणि गोंदियाचे जिल्हाधिकारी श्री. प्रजीत नायर यांच्या दरम्यान गुरुवार, दिनांक १६ मे २०२४ रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

गोंदिया जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संसाधनांचा वापर करून रोजगार निर्मिती व्हावी या दृष्टीने कौशल्य विकासावर भर दिला जात आहे. विद्यार्थी, तरुण- तरुणी, महिला यांच्याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने आगामी शैक्षणिक सत्रापासून कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करण्याच्या अनुषंगाने गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. कौशल्य प्रशिक्षणानंतर रोजगार/उद्योग स्थापण्याकरिता आवश्यक सहायता आणि सुविधा पुरविणे हे सुद्धा या अभियानात अंतर्भूत आहे. या बैठकीला विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, गोंदिया जिल्हाधिकारी श्री प्रजीत नायर, विद्यापीठाचे आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, विद्यापीठाच्या आजीवन, अध्ययन व विस्तार मंडळ सदस्या डॉ. कल्पना पांडे, विद्यापीठाच्या रेशीम उद्योग व्यवस्थापन व संशोधन केंद्राचे आंतरराष्ट्रीय तांत्रिक सल्लागार डॉ. सुरेश रैना, संचालक डॉ. सुरेश मसराम यांची यावेळी उपस्थिती होती.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'रिचिंग टू अनरीच्ड' अभियान राबविले जात आहे. या अभियान अंतर्गत स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करून रोजगाराची साधने उपलब्ध करून देत ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. जिल्ह्यातील गरजवंतांचे महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळाच्या 'ग्रीन चॅनल' या प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत कौशल्य विकसित केले जाणार आहे. याकरिता विद्यापीठाच्या वतीने विविध कौशल्य अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहे. कौशल्य प्रशिक्षणानंतर रोजगार/उद्योग स्थापण्याकरिता आवश्यक सहायता आणि सुविधा पुरविणे हे सुद्धा या अभियानात अंतर्भूत आहे. कौशल्य अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय कौशल्य परिषदेने निश्चित केलेल्या निकषाच्या आधारे गोंदिया जिल्हा प्रशासनाच्या सोबत मिळून कौशल्य विकास कार्यक्रम राबविला जाणार आहे.





## मणिपूरच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ ठरले आशेचे किरण

### माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे विद्यार्थ्यांनी मानले आभार

अखंडित झालेले शिक्षण पुन्हा सुरू ठेवण्याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आशेचा किरण ठरले असल्याच्या भावना मणिपूरच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. शैक्षणिक अडचणी लक्षात घेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने वेळीच प्रवेश दिल्याने माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचा मणिपूर येथील विद्यार्थ्यांनी सत्कार करीत विशेष आभार मानले.

मणिपूर येथे हिंसाचार सुरू असल्याने अशांतता निर्माण झाली. अशा विस्फोटक परिस्थितीत असंख्य विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे कठीण झाले. अशा परिस्थितीचा सामना करीत मणिपूर येथील काही विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची प्रवेश मिळावा म्हणून संपर्क साधला. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडचण लक्षात घेता तातडीने मदत करीत या विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये करवून घेतले. वेळीच मदत केल्याने अशांत असलेल्या मणिपूर येथील विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात त्यांचे शिक्षण सुरू ठेवता आले. मणिपूर येथील चुराचंदपूर तसेच कांगपोक्पी येथील विद्यार्थ्यांचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ प्रवेश घेणाऱ्यांमध्ये समावेश आहे. पाच विद्यार्थी व ४ विद्यार्थिनींना विद्यापीठाने विविध ठिकाणी प्रवेश दिला आहे. विद्यापीठाचा पदव्युत्तर गणित विभाग, पदव्युत्तर इंग्रजी विभाग, पदव्युत्तर मानसशास्त्र विभाग, पदव्युत्तर विधी विभाग आदी विविध विभागांमध्ये मणिपूर येथील एकूण ९ विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केले आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आलेली मदत त्याचप्रमाणे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधेमुळे विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. येथील निवास, भोजन व्यवस्था चांगली असल्याने शिक्षणात कोणतीच अडचण येत नसल्याची भावना या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील कुलगुरू कक्षात मणिपूरच्या विद्यार्थ्यांनी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचा सत्कार करीत विशेष आभार मानले. यावेळी मणिपूर येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



## राज्य सेवा हक्क आयोगाने केले कुलगुरूंचे अभिनंदन

### मणिपूरच्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिल्याने केली प्रशंसा

मणिपूर येथील विद्यार्थ्यांना स्नातकोत्तर शिक्षण पूर्ण करण्यासाठी मदतीचा हात पुढे केल्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या माननीय कुलगुरूंचे राज्य सेवा हक्क आयोगाने अभिनंदन केले आहे. राज्य सेवा हक्क आयुक्त नागपूर महसूल विभाग (मुख्य सचिव दर्जा) श्री. अभय यावलकर (भा.प्र.से., से.नि.) यांनी अश्या आशयाचे अभिनंदन पत्र कुलगुरूंना पाठविले आहे.

मणिपूर राज्यांमध्ये उसळलेल्या दंगलीत जमावाने केलेल्या हिंसाचारामुळे मणिपूर विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे मूळ प्रमाणपत्र इतर साहित्य सोबत जळुन खाख झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याचा धोका होता. अशा परिस्थितीमध्ये राज्य व घर सोडून आलेल्या मणिपूर येथील विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने मदतीचा हात पुढे करून त्यांचे स्नातकोत्तर शिक्षण पूर्ण करून दिले ही बाब प्रशंसनीय असल्याचे अभिनंदन पत्रात नमूद आहे. आपण मानवतावादी दृष्टिकोनातून घेतलेल्या या निर्णयाबद्दल माननीय कुलगुरूंचे पत्रात लिखित अभिनंदन केले आहे.

अखंडित झालेले शिक्षण पुन्हा सुरू ठेवण्याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आशेचा किरण ठरल्याने मणिपूरच्या विद्यार्थ्यांनी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचा काही दिवसांपूर्वी सत्कार केला होता, हे विशेष. मणिपूर येथे हिंसाचार सुरू असल्याने अशांतता निर्माण झाली. अशा विस्फोटक परिस्थितीत असंख्य विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे कठीण झाले. अशा परिस्थितीचा सामना करीत मणिपूर येथील काही विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची प्रवेश मिळावा म्हणून संपर्क साधला होता. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडचण लक्षात घेता तातडीने मदत करीत या विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये करवून घेतले होते. वेळीच मदत केल्याने अशांत असलेल्या मणिपूर येथील विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात त्यांचे शिक्षण सुरू ठेवता आले. विद्यापीठाचा पदव्युत्तर गणित विभाग, पदव्युत्तर इंग्रजी विभाग, पदव्युत्तर मानसशास्त्र विभाग, पदव्युत्तर विधी विभाग आदी विविध विभागांमध्ये मणिपूर येथील विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केले आहे.







# इनडोअर स्टेडियमचे काम गतीने करण्याचे निर्देश
## कुलगुरूंनी घेतला बांधकामाचा आढावा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रवी नगरस्थित क्रीडा संकुलात मल्टीस्टोरी मल्टीपरपज इनडोअर स्टेडियमच्या बांधकामास प्रारंभ झाला आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी नुकतीच विद्यापीठाच्या क्रीडा परिसराला भेट देत इनडोअर स्टेडियमचे बांधकाम गतीने करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

इनडोअर स्टेडियमचे काम दर्जेदार व्हावे आणि वेळेत पूर्ण व्हावे यासाठी अधिक वेगाने करण्याच्या सूचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. विद्यापीठाचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आंतरराष्ट्रीय दर्जाचा व्हावा या दृष्टिकोनातून इनडोअर स्टेडियमची इमारत तयार होत असतानाच स्टेडियममध्ये होऊ घातलेल्या खेळ प्रकारांसाठी लागणाऱ्या क्रीडा साहित्याची सूची तयार करून निवड करणे आदी प्रशासकीय मान्यता घेणेस्तव प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावा, असे निर्देश कुलगुरूंनी क्रीडा विभागाचे संचालक डॉ शरद सूर्यवंशी यांना दिले. तीन मजली असणाऱ्या या इनडोअर स्टेडियम मध्ये बास्केटबॉल, हँण्डबॉल, जिम्नास्टिक, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कबड्डी, कुस्ती आणि ज्युडो आणि अशा दहा खेळांची मैदानी राहणार आहेत. तळमजल्यावर बास्केटबॉल आणि पहिल्या माळ्यावर हँडबॉल अशी दोन खेळांची स्वतंत्र बंदिस्त मैदाने असणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे मध्य भारतातील एकमेव विद्यापीठ ठरणार आहे, हे या ठिकाणी उल्लेखनीय आहे.

अद्यावत प्रकाश योजनेमुळे दिवस-रात्र (डे नाईट) सामने या ठिकाणी घेता येणार आहेत. स्टेडियम मधील प्रकाश योजनेची सविस्तर माहिती घेणे करता एक स्वतंत्र बैठक आयोजित करण्याबाबतची सूचना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता वर्षा घुशे यांना केल्या. विद्यापीठाच्या इनडोअर स्टेडियम प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या वतीने सुमारे ४४.४४ कोटी रुपये मंजूर केलेल आहेत. यापैकी रुपये २० कोटी रुपयांचा पहिला हप्ता विद्यापीठात प्राप्त होऊन तो सार्वजनिक विभागास हस्तांतरित करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात येण्यासाठी असणारे मुख्य प्रवेशद्वार हे मोठे आणि भव्य असावे अशा सूचना डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यापीठ अभियंता नितीन विश्वकार यांना दिल्या. विद्यापीठ क्रीडा परिसरा समोरून नवीन उड्डाणपूल तयार झाल्याने वाहनांना ये-जा करण्याकरिता अधिक सोयीचे व्हावे यासाठी नवीन प्रवेशद्वार क्रीडा संकुलाचे मुख्य रस्त्यावर उभारण्यात यावे, याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश कुलगुरूंनी विद्यापीठ अधिकाऱ्यांना दिलेत. यासभेला तांत्रिक समितीचे सदस्य तसेच आंतर विद्याशाखिय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्यद्वय डॉ. धनंजय वेळूकर आणि द्रोणाचार्य व अर्जुन पुरस्कार्थी विजय मुनीश्वर यांचेसह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता वर्षा घुशे, उपअभियंता अतुल गोटे, सहाय्यक अभियंता मोना नंदेश्वर, विद्यापीठ अभियंता नितीन विश्वकार, प्रकल्पाचे आर्किटेक आनंद सारडा, विद्यापीठाचे उद्यान अधीक्षक प्रवीण गोतमारे आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद सूर्यवंशी आदी उपस्थित होते.





# 'सिएट'च्या प्लेसमेंट ड्राईव्हला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण मॉड्यूल तयार करणार - कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी

## विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित सिएट कंपनीच्या प्लेसमेंट ड्राईव्हला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराज बाग येथील विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात सिएट कंपनीचा प्लेसमेंट ड्राईव्ह मंगळवार, दिनांक २८ मे २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ दरम्यान घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी मुलाखतीच्या तयारीबाबत विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण मॉड्यूल तयार करणार असल्याचे सांगितले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्लेसमेंट मिळावे तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या म्हणून रोजगार व प्रशिक्षण विभाग सुरू केल्याची माहिती माननीय कुलगुरू डॉ. चौधरी यांनी पुढे बोलताना दिली. या विभागामार्फत आयोजित रोजगार मेळाव्यातून बीए, बीकॉम, बीएससी अशा पारंपारिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रथमच प्लेसमेंट ड्राईव्ह मार्फत विद्यापीठाने रोजगाराची संधी दिली आहे. रोजगार मेळाव्यांसोबतच विद्यार्थ्यांना विविध कौशल्य प्राप्त करता यावे म्हणून कौशल्य अभ्यासक्रम देखील विद्यापीठाकडून सुरू करण्यात आले आहे. स्थानिक उद्योगांना आवश्यक असणारे मनुष्यबळ या कौशल्य अभ्यासक्रमाच्या माध्यमातून तयार होत आहे. मुलाखतीला जाताना अनेकदा विद्यार्थ्यांची तयारी नसते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता असते. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन चांगल्या प्रकारे मुलाखतीला सामोरे जाण्याचे प्रशिक्षण विद्यापीठाकडून दिले जाणार आहे. त्याकरिता प्रशिक्षण मॉड्यूल तयार करणार असल्याचे कुलगुरू म्हणाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शिक्षणासोबतच रोजगाराची संधी उपलब्ध होत असून अन्य विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे आवाहन यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. चौधरी यांनी केले. यावेळी शताब्दी महोत्सव कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष कसबेकर, विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाचे डॉ. भूषण महाजन, सिएट कंपनीचे असिस्टंट मॅनेजर एचआर आनंद कद्रे, एक्झिक्यूटिव्ह एचआर अक्षय पांडे यांच्यासह कंपनीचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

## अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सहभाग

भारतातील नामांकित टायर उत्पादन आणि आरपीजी समूहाची मोठी कंपनी असलेल्या सिएटच्या प्लेसमेंट ड्राईव्ह करिता एकूण २१४२ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली होती. त्यापैकी सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी प्राथमिक चाळणी परीक्षा दिली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासह गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती तसेच मध्य प्रदेशातील बालाघाट, छिंदवाडा, कटनी, डोंगरगड आदी भागातील विद्यार्थी देखील या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये सहभागी झाले होते.





# भारतीय ज्ञान परंपरेचे विद्यार्थ्यांना मिळविता येणार ज्ञान

## विद्यापीठाचा हिंदू धर्म संस्कृती मंदिरासोबत सामंजस्य करार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना आता भारतीय ज्ञान परंपरेचे संशोधन तसेच विस्तृत ज्ञान प्राप्त करणे शक्य होणार आहे. याबाबत हिंदू धर्म संस्कृती मंदिरा सोबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत जमनालाल बजाज प्रशासकीय भवन येथे आयोजित कार्यक्रमात या सामंजस्य कराराचे हस्तांतरण मंगळवार दि. २१ मे २०२४ रोजी करण्यात आले.

भारतातील वैविध्यपूर्ण असा प्राचीन ज्ञानाचा विद्यार्थ्यांना अभ्यास करता यावा. तत्कालीन प्रगत भारतीय ज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये 'भारतीय ज्ञान परंपरा' याचा समावेश करण्यात आला आहे. एनईपी २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान परंपरा अभ्यासता यावी. यावर अधिक संशोधन करता यावे म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने हिंदू धर्म संस्कृती मंदिरा सोबत सामंजस्य करार केला आहे. या सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. राजू हिवसे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश सिंह आणि हिंदू धर्म संस्कृती मंदिर यांच्या वतीने डॉ. सुधाकर इंगळे व मंगेश श्रीराम जोशी यांनी स्वाक्षरी केली आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या कक्षात झालेल्या कार्यक्रमाला प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश सिंह, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर, शिक्षण मंचचे महामंत्री डॉ. सतीश चाफले, हिंदू धर्म संस्कृती मंदिराचे डॉ. सुधाकर इंगळे, मंगेश जोशी, अर्थश्री मराठे, श्रीरंग चितळे, राजेश दामले, श्री तुरळकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## प्राचीन साहित्यावर होणार संशोधन

भारतीय प्राचीन ज्ञानासंबंधी साहित्य हिंदू धर्म संस्कृती मंदिर त्यांच्याकडे संरक्षित आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास करू इच्छिणारे संशोधक तसेच विद्यार्थ्यांना हिंदू धर संस्कृती मंदिर यांच्याकडील प्राचीन भारतीय साहित्य संशोधनाकरिता हाताळता येणार आहे. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान परंपरेचा सखोल अभ्यास करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विद्यापीठ तसेच हिंदू धर्म संस्कृती मंदिर यांच्या दरम्यान शैक्षणिक आदान प्रदान देखील केले जाणार आहे. त्याचप्रमाणे पारंपरिक संशोधन देवान घेवान देखील होणार आहे. या सोबतच परिषदा, सेमिनार, कार्यशाळा, सिम्पोजियम, विविध स्पर्धा, श्रेयांक बदल आधी विविध उपक्रम राबविणे शक्य होणार आहे.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात मंगळवार, दिनांक २८ मे २०२४ रोजी हा कार्यक्रम पार पडला.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री. प्रदीप बिनीवाले व सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री. गणेश कुमकुमवार यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या प्रतिमेस हारार्पण करण्यात आले. यावेळी सर्वश्री युडीसी शैलेश राठोड, मनोज मोरे, योगेश केवटे, रुपेश आतराम, कवडू भोयर, मधुकरराव इंगोले, मोरेश्वर उमरेडकर, अनिल खरे, नरेंद्र पवार, कार्तिक हरडे, प्रदीप झोडे, आसिफ शेख, शितल शेटे यांच्यासह अन्य उपस्थित होते.



## मूल्यांकनाची जबाबदारी महत्त्वपूर्ण - डॉ. संजय दुधे - डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात मूल्यांकन कार्यशाळा

शिक्षकांवर मूल्यांकनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी असते, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात प्राध्यापकांसाठी मूल्यांकन कार्यशाळा घेण्यात आली. या मूल्यांकन कार्यशाळेत डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

कार्यशाळेचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांची उपस्थिती होती. उन्हाळी परीक्षांचे मूल्यांकन गुणात्मक दृष्टीने उत्तम व्हावे यासाठी विधी महाविद्यालयात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती डॉ. दुधे यांनी पुढे बोलताना दिली. मूल्यांकन करीत असताना शिक्षकांनी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजे. त्यामुळे मूल्यांकनाची जबाबदारी सुरळीतपणे पार पाडण्यास मदत मिळेल असे प्र-कुलगुरु डॉ. दुधे म्हणाले. परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे यांनी मार्गदर्शन करताना विद्यापीठाच्या परीक्षा व्यवस्थित आणि सुरळीत होण्याकरिता प्राध्यापकांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी मूल्यांकन करताना विद्यार्थ्यांनी केलेले परिश्रम शिक्षकांनी लक्षात घेतले पाहिजे, असे सांगितले. कार्यशाळेचे प्रास्ताविक व आभार व्यक्त करताना विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी विद्यार्थी हा केंद्रस्थानी असल्याने त्यांचेही जोपासले जाईल, असा विश्वास व्यक्त केला. मूल्यांकन कार्यशाळेला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची संलग्नित सर्वच विधी महाविद्यालयांचे प्राचार्य आणि शिक्षक गण उपस्थित होते.




## साहित्य सामाजिक परिवर्तनाचा आधार दिल्ली आकाशवाणीचे माजी उपमहानिदेशक लक्ष्मी शंकर वाजपेयी यांचे प्रतिपादन

साहित्य क्रांती करीत नाही. मात्र, क्रांतीसाठी पार्श्वभूमी नक्कीच तयार करते. साहित्य सामाजिक परिवर्तनाचा आधार देखील असल्याचे प्रतिपादन साहित्य अमृतचे संपादक तथा दिल्ली आकाशवाणीचे माजी उपमहानिदेशक श्री लक्ष्मी शंकर वाजपेयी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागातील भाषा भवन येथे गुरुवार, दिनांक ९ मे २०२४ रोजी पार पडलेल्या विशेष व्याख्यानात श्री. वाजपेयी मार्गदर्शन करीत होते.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी केली. यावेळी पुढे बोलताना श्री. वाजपेयी यांनी सामाजिक चिंतनामुळेच साहित्य समाजासोबत जुळत असून हेच त्याचे महत्त्व आणि त्याची सामाजिक उपयुक्तता असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी साहित्यिक चिंतनाचे प्रमाण मोठे असावे असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन संयोजक डॉ. कुंजनलाल लिल्हारे यांनी केले तर आभार डॉ. लखेश्वर चंद्रवंशी यांनी मानले. कार्यक्रमाला संतोष बादल, डॉ. सुमित सिंह, नीरज श्रीवास्तव, डॉ. आभा सिंह, प्रा. दामोदर द्विवेदी, अनिल त्रिपाठी, मधू मिश्रा, मधुलता व्यास, टीकाराम साहू, ज्ञानेश्वर में लेकर, रीमा चड्ढा, मधु गुप्ता यांच्यासह संशोधक आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.





# तीन विद्यार्थ्यांना २.६४ लाखांची आर्थिक मदत

## माता मंजुळाबाई विद्यार्थी वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत विद्यार्थ्यांना दिलासा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने विद्यार्थी कल्याण योजना अंतर्गत तीन विद्यार्थ्यांना एकूण २.६४ लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. माता मंजुळाबाई विद्यार्थी वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत ही मदत करण्यात आली. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते गुरुवार, दिनांक २ मे २०२४ रोजी आर्थिक मदतीचे धनादेश वितरित करण्यात आले.

माता मंजुळाबाई विद्यार्थी वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत सहायता निधी प्राप्त करणाऱ्यांमध्ये योगिता रवींद्र मोहीनकर, दृष्टी सुरेश नेरीकर व प्रफुल्ल हरिदास चलाख या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. कुलगुरू कक्षात धनादेश वितरण प्रसंगी विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक व राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. योगिता रवींद्र मोहीनकर ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागात २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात एमफार्म २ ची विद्यार्थिनी होती. सेवादल महिला महाविद्यालयाची २०२३-२४ या शैक्षणिक सत्रातील कला शाखेच्या तृतीय वर्षातील विद्यार्थिनी दृष्टी सुरेश नेरीकर हिला उपचार घेण्याकरिता झालेला खर्च म्हणून १ लाख रुपयांची मदत विद्यार्थी कल्याण योजनेतून करण्यात आली. विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातील २०२२-२३ या शैक्षणिक सत्रातील एमए द्वितीय वर्षाचा विद्यार्थी प्रफुल्ल हरिदास चलाख या विद्यार्थ्याला अपघात झाल्यानंतर शस्त्रक्रिया करण्याकरिता झालेल्या उपचाराचा खर्च म्हणून ६४ हजार ३४७ रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

---

# जागतिक स्तरावर संशोधकांच्या ०.०५ टक्के यादीमध्ये डॉ. संजय ढोबळे यांचा समावेश

## २ टक्के वैज्ञानिकांच्या जागतिक यादीतून ते आता ०.०५ टक्केच्या यादीत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे यांचे नाव स्कॉलर जीपीएस या नामांकित यादीत ०.०५ टक्के मधील जगभरातील वैज्ञानिकांमध्ये संलग्नित झाले आहे. डॉ. संजय ढोबळे यांच्या संशोधनातील सर्वोत्कृष्ट कामगिरीमुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान प्राप्त झाला आहे.



जगभरातील १७७ शाखा व १४ विभिन्न विषयातील ३,५०,००० मुख्य वैज्ञानिकांच्या ०.०५ टक्के यादीमध्ये नाव आल्यामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला जगाच्या पटलावर नेण्यात डॉ. संजय ढोबळे यांना यश प्राप्त झाले आहे. त्यांचे संशोधन कार्य ल्युमिनिसेन्स मटेरियलवर असून या विषयात जगातील १७ वैज्ञानिकांची यादी तयार करण्यात आली आहे. यामध्ये ते ५ व्या क्रमांकावर असून भारतातील ते एकमेव वैज्ञानिक आहे. याचबरोबर भौतिकशास्त्र या विषयात ९,९५,७९१ वैज्ञानिकांचा समावेश असून जगातील या यादीमध्ये १९८१ या क्रमांकावर असून ते ०.२ टक्के संशोधकांमध्ये त्यांचे नाव आहे. जीवनभरातील संशोधन कार्य करून संशोधनाच्या सर्व निकषांमध्ये एकंदरीत ०.०५ टक्के यामध्ये डॉ. संजय ढोबळे यांचा समावेश आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, आयआयएल संचालक डॉ. राजेश सिंह, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांच्यासह सर्व प्राध्यापकांनी डॉ. संजय ढोबळे यांचे अभिनंदन केले आहे.



## मनाची तयारी करा, बदल निश्चित घडतो - कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे तरुणांना आवाहन

### युवा व्यक्तिमत्व - वक्तृत्व, कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त आयोजन

कार्यशाळेत आपण तत्वज्ञानाचा अभ्यास करतो आहे. याकडे लक्ष घालावे लागेल. मनाची तयारी करा, बदल निश्चित घडतो, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. शताब्दी महोत्सवी वर्षा निमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विदर्भ युथ ऑर्गनाईजेशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग, एलएडी चौक, गांधी नगर, नागपूर येथे शनिवार, दि. १८ ते सोमवार २० मे दरम्यान 'राष्ट्रसंतांच्या मूल्यांतील व्यक्तिमत्व - संवाद कौशल्य विकास' या विषयावर तीन दिवसीय युवा प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली आहे. या प्रशिक्षण कार्यशाळेचे शनिवार, दि. १८ मे रोजी उद्घाटन करताना डॉ. चौधरी बोलत होते. कार्यशाळेच्या उद्घाटन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी संत साहित्याचे अभ्यासक, प्रसिद्ध युवा वक्ते तथा अ.भा.अंनिसचे महाराष्ट्र राज्य युवा संघटक पंकज वंजारे तर प्रमुख अतिथी म्हणून आंतरविद्याशाखिय अभ्यास विद्याशाखा विभागाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू , गांधी विचारधारा विभाग प्रमुख श्री. प्रमोद. व्ही. वाटकर, विदर्भ युथ ऑर्गनाईजेशनचे मार्गदर्शक डॉ. नरेंद्र चौधरी, अ.भा.अंनिस राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे, राज्य महिला शाखा संघटक छाया सावरकर, नागपूर जिल्हाध्यक्ष सुनिल वंजारी, पूर्व विदर्भ संपर्क प्रमुख सुधिर आंडे यांची उपस्थिती होती. मागील १०० वर्षांमध्ये विद्यापीठाने विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना घडविले असून समाज घडविण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून विद्यापीठाने शताब्दी वर्षात 'ग्राम चलो अभियान' सुरू केल्याची माहिती कुलगुरू डॉ. चौधरी यांनी पुढे बोलताना दिली. 'रिचिंग टू अनरीच्ड' कार्यक्रम लहान नाही. या अभियानातील कार्य वाटते इतके सोपे नाही. विद्यापीठाकडे मोठे संसाधन असून ते सुप्तावस्थेत पडले आहे. विद्यार्थ्यांपुढे परीक्षा देत केवळ पदवी प्राप्त करणे एवढाच उद्देश राहिला आहे. मात्र, शिक्षण म्हणजे केवळ पदवी प्राप्त करणे नव्हे. स्वतःच्या पायावर उभे राहत कुटुंब, समाजाला समोर नेणारे शिक्षण असल्याचे कुलगुरू डॉ. चौधरी म्हणाले.

आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी प्रास्ताविक करताना युवकांचे देशाच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान असल्याचे सांगितले. राष्ट्रसंतांच्या मूल्यावर चालणारे युवक तयार करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे ते म्हणाले. अ. भा. अनिसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष श्री सुरेश झुरमुरे यांनी देशाचा आधारस्तंभ असलेला युवक सशक्त होण्याची गरज व्यक्त केली. या प्रशिक्षण कार्यशाळेतून युवक सशक्त होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रशिक्षक पंकज वंजारे यांनी मनोगत व्यक्त करताना अधिक लोकसंख्या असलेल्या युवकांमध्ये गुणवत्ता निर्माण करावी लागेल. राष्ट्रसंतांच्या विचारांचे प्रचारक तयार करावे लागेल असे सांगितले. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन सृष्टी बोरकर तिने केले तर आभार गांधी विचारधारा विभाग प्रमुख श्री प्रमोद वाटकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिसचे जिल्हाध्यक्ष सुनील वंजारी प्रा हर्षाली लोहकरे विदर्भयुत ऑर्गनायझेशनचे सृष्टी बोरकर हिमांशू महाजन यांच्यासह अन्य प्रयत्नरत आहेत.



### दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनी घेतली प्रतिज्ञा

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात दिवंगत माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांना वाहिली आदरांजली

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस मंगळवार, दिनांक २१ मे २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडला. यावेळी दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञा घेत दिवंगत माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञा दिली. दहशतवाद व हिंसाचार विरोध दिवस कार्यक्रमास कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांचेसह सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, सर्व विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




## संत साहित्यातूनच तरुणांचा व्यक्तिमत्व विकास

### पंकज वंजारे यांचे प्रतिपादन

**- युवा व्यक्तिमत्व - वक्तृत्व, कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा**

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त आयोजन**

संतांनी आपल्या साहित्यातून आनंदी जीवन जगण्याचे मार्ग आणि तत्वज्ञान दिले आहे. ज्याची आजच्या पिढीला नितांत गरज असून संत साहित्यातूनच तरुणांचा व्यक्तिमत्व विकास होतो, असे प्रतिपादन अंनिसचे महाराष्ट्र राज्य युवा संघटक तथा प्रसिद्ध वक्ते श्री पंकज वंजारे यांनी केले. विद्यापीठाच्या पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग येथे 'राष्ट्रसंतांच्या मूल्यांतील व्यक्तिमत्व - संवाद कौशल्य विकास' या विषयावर दि.१८ ते २० मे दरम्यान तीन दिवसीय युवा प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. शताब्दी महोत्सवी वर्षा निमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विदर्भ युथ ऑर्गनाईजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत प्रशिक्षक म्हणून वंजारे मार्गदर्शन करीत होते.

यावेळी मंचावर विद्यापीठाचे आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग प्रमुख डॉ. प्रमोद वाटकर, प्रशिक्षक पंकज वंजारे, डॉ. धनंजय सोनटक्के यांची उपस्थिती होती. 'संतांचा जीवन दृष्टीकोन, वेळ, करिअरचे व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांनी संत कबीर , संत रोहीदास, ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत रामदास , राष्ट्रसंत तुकडोजी, गाडगे महाराज यांच्या साहित्यातील दाखले देत संत कोणाला म्हणावे असे सांगितले. ज्याच्याजवळ विवेक तोच संत आहे. असे संत ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटले आहे. प्रत्येक प्रश्न समस्यांचे उत्तर विवेकातून सोडविता येतात. मात्र, आपणच संतांना समजू शकलो नाही ,असे ते म्हणाले.

संत साहित्यातील विविध उदाहरणे देत वेळ, करिअरचे व्यवस्थापन कशा प्रकारे केला जाऊ शकते. त्याचा व्यक्तिमत्व विकासात कशाप्रकारे उपयोग होऊ शकतो, याचे सविस्तर मार्गदर्शन वंजारे यांनी केले. यावेळी आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी मार्गदर्शन करताना, तरुण पिढीला संतांना शिकण्याची गरज व्यक्त केली. डॉ. धनंजय सोनटक्के यांनी देखील विचार व्यक्त करताना काही उदाहरणे देत युवकांना प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे संचालन करीत सृष्टी बोरकर हिने आभार मानले.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात शुक्रवार, दिनांक ३१ मे २०२४ रोजी हा कार्यक्रम पार पडला.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री. प्रदीप बिनीवाले व सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री. गणेश कुमकुमवार यांच्या शुभहस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करीत हारार्पण करण्यात आले. यावेळी सर्वश्री युडीसी शैलेश राठोड, जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, योगेश केवटे, रुपेश आतराम, रितेश पुरकाम, दिपक घोडमारे, कवडू भोयर, भास्कर शेंडे, अनिल खरे, नरेंद्र पवार, कार्तिक हरडे, प्रदीप झोडे, आसिफ शेख, शितल शेटे यांच्यासह अन्य उपस्थित होते.





# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

## माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६४ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर सिव्हिल लाईन येथे बुधवार, दिनांक १ मे २०२४ रोजी सकाळी ८ वाजता माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल साबळे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्यासह विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी केले.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कर्तव्यपूर्ती सोहळा
# मूल्यवान जीवनाला सुंदर करा- प्र-कुलगुरू डॉ. दुधे






राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा कर्तव्यपूर्ती सोहळा शुक्रवार, दिनांक ३१ मे २०२४ रोजी पार पडला. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी मूल्यवान असलेल्या जीवनाला आणखी सुंदर बनविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे तर प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या शुभहस्ते ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातून सेवानिवृत्त झालेले श्री. धनराज गोविंदराव लंगडे, गोपनीय विभागातून निवड श्रेणी लिपिक म्हणून सेवानिवृत्त झालेले श्री. रवींद्र दयाराम बोरकर, गोपनीय विभागातून निवड श्रेणी लिपिक म्हणून सेवानिवृत्त झालेले श्री. ज्ञानेश्वर किसनराव वन्नारकर, सामान्य परीक्षा व चौकशी विभागातून निवड श्रेणी लिपिक म्हणून सेवानिवृत्त झालेले श्री ललितकुमार दाजीबा मेश्राम यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना प्र-कुलगुरु डॉ. दुधे यांनी आज तंबाखू विरोधी दिवस असल्याने तंबाखूच्या दुष्परिणामाबाबत माहिती दिली. तंबाखू सेवनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून मुलांसोबत मुलींमध्ये देखील याचे प्रमाण धक्कादायक असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच सेवानिवृत्त होत असलेल्या कर्मचाऱ्यांना पुढील आयुष्य आणखी सुंदर करण्यासाठी चांगल्या गोष्टी आत्मसात करण्याबाबत माहिती दिली. उपस्थितांचे आभार मानताना कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी सेवानिवृत्ती निमित्त विद्यापीठाच्या वतीने करण्यात आलेला सत्कार स्वीकारल्याबद्दल सत्कारमूर्तींचे व त्यांच्या कुटुंबीयांचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन दीपक घोडमारे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठ विविध प्राधिकारणीचे सदस्य, विभाग प्रमुख, शिक्षक अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



## नागपूर विद्यापीठाचा सेपक टॅकरा संघाची घोषणा

त्रिशूर, कर्नाटक येथे कालिकत विद्यापीठाच्या यजमानपदाखाली सेंट मॅरी कॉलेजमध्ये ८ ते १० मे दरम्यान महिलांच्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सेपक टॅकरा स्पर्धेसाठी नागपूर विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाची घोषणा केली आहे.

क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागात छोटेखानी समारंभामध्ये विद्यापीठ महिला संघाला शुभेच्छा देण्यासाठी विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे सदस्य प्राचार्य डॉ. सुरेश मोहितकर आवर्जून उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करीत त्यांना स्पर्धेसाठी आशीर्वाद दिलेत. याप्रसंगी विनोद मेश्राम, जावेद रहमान, नरेश चव्हाण आदी उपस्थित होते.

नागपूर विद्यापीठ संघ पुढीलप्रमाणे - महक शेख (धनवटे नॅशनल कॉलेज), सोनल धाडसे (कलोडे महाविद्यालय), जवेरिया कुरेशी, चेतना रोंगला, वेदिका मौर्या, स्नेहा उईके, आचाल मौर्या, (सर्व हिस्लॉप कॉलेज), विद्या चौरे (डॉ. आंबेडकर कॉलेज), कल्याणी बनकर (एम.बी. पटेल कॉलेज, सालेकसा), वैशाली बनवनकर (राजीव गांधी कॉलेज, गोंदिया), त्रिशा गलांडे (रायसोनी अभि. कॉलेज), रिया शर्मा (प्रेरणा कॉलेज). राखीव-प्राची चटप (जे.एम. पटेल कॉलेज, भंडारा). प्रशिक्षक वर्षा उईके आणि व्यवस्थापक डॉ. प्रवीण पाटील.





## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला रौप्यपदक अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वुडबॉल स्पर्धा

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या सहकार्याने जेएनसीटी प्रोफेशनल विद्यापीठ, भोपाल यांच्या यजमानपदाखाली घेण्यात आलेल्या अखिल भारतीय विद्यापीठ वुडबॉल चॅम्पियनशीप वुडबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाने दुसऱ्या स्थानासह रौप्यपदक प्राप्त केले.

भोपाळ येथे पार पडलेल्या या स्पर्धेत महिलांच्या स्ट्रोकच्या सांघिक प्रकारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने रौप्यपदक प्राप्त केले. विद्यापीठाच्या महिला संघात एनटीसीपीई कॉलेजची हर्षला घोटाळे, रुपाली खोडे, जेएन कॉलेजची शीतल जाधव, एडी भारसिंगी कॉलेजची रसिका भक्ते, एनएसएसएमची पुजा गायकवाड, पीजीटीडी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची रुतिका किन्हेकर, राधा महाविद्यालयाची पुनम खोपे, नबीरा कॉलेजची सोनाली लोहकरे यांचा समावेश होता.

पुरुष सांघिक प्रकारातही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने रौप्यपदक प्राप्त केले. विजयी संघात जीएस कॉलेज वर्धेचा मीतकुमार त्रिवेदी, नबीरा कॉलेजचा वृषभ गौरखेडे, एडी कॉलेजचा सोपान घोरपडे, जेएन कॉलेजचा कुणाल चरडे, आयडीसीपीईचा पीयूष खोपे, क्रिष्णा सिहाज, तिरपुडे कॉलेजचा मिहीर मोहुर्ले, व्हीएन कॉलेजचा श्याम नेती आदींचा समावेश आहे.

प्रशिक्षक डॉ. प्रमोद नेती, डॉ. वर्षा बोरकर, डॉ. उज्वला भारसकर व्यवस्थापक डॉ. अनिल वाळके, डॉ. मनोज वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी ही कामगिरी केली आहे. खेळाडूंनी केलेल्या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी अपेक्षित कामगिरी केल्याचे सांगत आनंद व्यक्त केला आहे. तर विद्यापीठाच्या संघाने केलेल्या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे माननीय कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे आदींनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## एकेरीत शशांक चतुर्वेदी चे सुवर्ण यश

स्ट्रोक प्रकारात पुरुषांच्या एकेरीत गोंदियाच्या पुजा महाविद्यालयाचा शशांक चतुर्वेदीने सुवर्ण पदक प्राप्त केले. तर महिला गटात एडी कॉलेज भारसिंगीच्या दीक्षा काटोलेने रौप्य पदक प्राप्त केले.

## दुहेरी व मिश्र दुहेरीत सुवर्ण

महिला गटात स्ट्रोक प्रकारात मिश्र दुहेरीत महिलांनी सुवर्ण पदक पटकाविले. डीबीएम कॉलेज गोंदियाच्या संदीप यादव व मोनिका राम यांचा यात समावेश आहे. तर फेअरवेच्या दुहेरीत पुरुष गटात एनटीसीपीईचा उमेश राजपुत व के. डी. पवार सावनेर महाविद्यालयाचा सुरेशकुमार जाट या जोडीने सुवर्ण पदक मिळविले. याव्यतिरिक्त महिला फेअर वे प्रकारात एकेरीत डीबीएम कॉलेजच्या सुमन इनानियाने रौप्यपदक प्राप्त केले.



## नागपूर विद्यापीठाच्या सॉफ्टबॉल संघाची घोषणा

बंगळुरु विद्यापीठाच्या यजमानपदाखाली बंगळुरु येथील अखिल भारतीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मुलांच्या संघाची घोषणा नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी केली.

यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. नितीन जंगीटवार, विद्यापीठाच्या निवड समितीचे सदस्य डॉ. चेतन महाडिक, डॉ. विवेक साहू, ॲथ्लेटिक्स प्रशिक्षक अर्चना कोट्टेवार, विनोद मेश्राम आदी उपस्थित होते.

**विद्यापीठाचा संघ पुढीलप्रमाणे :** अद्वैत महाडिक, गौरव कुंदावाले, संकेत मौदेकर, अयान खान (सर्व कमला नेहरु महाविद्यालय), कशीष पाटील, आदित्य मेश्राम (डॉ. आंबेडकर कॉलेज), अनिकेत तांबडे (नाशिकराव तिरपुडे कॉलेज), राहुल बावरिया (अण्णासाहेब गुंडेवार कॉलेज), हरीष नालचेलवार ( डीआरबी सिंधू महाविद्यालय), श्रेयांश सोनी (जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी कॉलेज), अवधेश तिडके (वायसीसीई कॉलेज), यश गुरव (तिरपुडे मॅनेजमेंट कॉलेज), ओम बासटवार (न्यू आर्टस् कॉलेज). राखीव खेळाडू- अनिरुद्ध सोनेश्वर (कमला नेहरु महाविद्यालय), विवेक साहू, प्रियांशू जैन (डॉ. आंबेडकर कॉलेज). प्रशिक्षक: प्रणय सुखदेवे, व्यवस्थापक: डॉ. चेतन महाडिक.



## सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा विभागात कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या २०२२-२३ या शैक्षणिक सत्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा विभागाच्या परीक्षेत सुवर्णपदक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात अमरावती येथील प्रा. नरेंद्र राऊत यांचा देखील सत्कार करण्यात आला. विद्यापीठ परिसरातील ग्रामगीता भवन येथे हा कार्यक्रम गुरुवार, दिनांक ९ मे २०२४ रोजी पार पडला.

ग्रामगीता भवन येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे होते. यावेळी अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांची प्रामुख्याने उपस्थित होती. या कार्यक्रमात विद्यापीठाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या २०२२-२३ या शैक्षणिक सत्रातील परीक्षेत डॉ. अविनाश नवखरे यांनी सुवर्णपदक प्राप्त केले. या कार्यक्रमात डॉ. अविनाश नवखरे आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सुवर्णपदक विजेते प्रा. नरेंद्र राऊत यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी केले. डॉ. पाखमोडे यांनी राष्ट्रसंतांचे साहित्य हे तुकाराम महाराज व नामदेव महाराजांच्या साहित्याइतकेच महत्त्वाचे आहेत, असे विचार त्यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. समीर कुमरे यांनी केले आणि प्रा. वर्षा पाटील यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु. छाया खोब्रागडे व कु. कल्याणी मेश्राम यांचे सहकार्य लाभले.



## विद्यापीठ महिला नेटबॉल संघाची घोषणा

त्रिशूर (केरळ) येथील कालिकत विद्यापीठाच्या यजमान पदाखाली आयोजित महिलांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेटबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी महिलांचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघ जाहीर केला आहे.

`क्रीडा व शिक्षण विभागात संपन्न छोटेखानी कार्यक्रमात खेळाडूंना शुभेच्छा देण्यासाठी विद्यापीठाच्या शिक्षण अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ आदित्य सोनी आणि विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ शरद सूर्यवंशी उपस्थित होते. याप्रसंगी श्री जावेद रहेमान आणि विनोद मेश्राम यांनी खेळाडूंना स्पर्धेसंबंधीची माहिती आणि सूचना दिल्यात.

**विद्यापीठ संघ पुढीलप्रमाणे:** अंजली बर्वे, पायल कुंभलकर, सपना टिचकुले, शिल्पा तरारे (जे. एम.पटेल कॉलेज, भंडारा), आयुषी मुरकुटे, मिनल रावते (एनएमडी कॉलेज, गोंदिया), मेघा शर्मा (धनवटे नॅशनल कॉलेज), पूजा बेदूरकर (कला, वाणिज्य, विज्ञान कॉलेज, जवाहर नगर), जान्वी देऊळकर (महात्मा गांधी कॉलेज, पारशीवनी), सुहानी बिरबल (डॉ. आदमने कॉलेज, सावनेर). राखीव इशा चौधरी (धनवटे नॅशनल कॉलेज), खुशबू पिपरेवार (महात्मा गांधी कॉलेज, पारशीवनी). प्रशिक्षक कटकवार आणि व्यवस्थापक विलास पराते.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज जयंती

